Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# भारतीय स्त्री: गुलामगिरी व स्त्रीवाद

**प्रा.डॉ. कार्तिक गावंडे**
इतिहास विभागप्रमुख,
अंकुशराव टोपे महाविद्यालय,
जालना.

**माळी नितीन**
संशोधक विद्यार्थी

प्राचीन काळापासून स्त्रीला शक्ती, अर्धांगिणी मानण्यात आले. तेचा देवतेचे स्वरुप देण्यात आले परंतू फक्त नावापुरतेच कारण आपण जितके खोलवर जाऊ तेवढे विपरितच चित्र पहायला मिळणार आज मानवाने अनेक संशोधन केले, खूप प्रगती केली परंतू स्त्रीकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोण मात्र बदलत नाही. समाजाचा अर्धा घटक असलेल्या स्त्रीस 'विकासापासून वंचित ठेवले जाते. त्या समाजास विकसित म्हणणे चूकीचे आहे.)

आजही बहुपत्नीत्व, बालहत्या, भृणहत्या आदि अनेक समस्यांनी आजची स्त्री ग्रस्त झालेली आपणास आढळून येईल. आजही कुटुंबात मुलीचा जन्म अशुभ मानला जातो. हुंडाबळी, देवदासी इत्यादी प्रथा सर्रास चालतात.

**स्त्रीवादाचा उगम :**

सिंधू संस्कृतीत स्त्रीस महत्व दिल्या गेल्याचे अनेक पुराव्यावरुन सिध्द होते. याळात मातृसत्ताक पध्दतीचे अनेक पुरावे मिळतात. परंतु या संस्कृतीच्या ऱ्हासाबरोबरच स्त्रीयांच्या परिस्थितीतही ऱ्हास होत गेला आणि आजच्या काळात या ऱ्हासाने चरमोत्कर्ष गाठला.

सिंधू संस्कृतिसारखी मातृसत्ताक पध्दती परत निर्माण होण तर केवळ अशक्य आहे. परंतू किमान स्त्रीचा सामाजिक दर्जा सुधारणे, तीला जगण्याचा अधिकार मिळविणे, स्वातंत्र्य उपभोगू देणे एवढे तरी बदल व्हावा या हेतूने आजचा स्त्रीवाद समोर आला आहे.

आजचा स्त्रीवाद ही आधुनिक काळातील संकल्पना आहे. ही संकल्पना अनेक मानवतावादी विचारवंत, औद्योगिकरण, दोन महायुध्दाच्या दरम्यान जी सामाजिक परिस्थिती निर्माण झाली. त्याचे अपत्य आहे. प्लेटोनेही स्त्री समानतेचा पुरस्कार केला. स्त्रीवाद या संकल्पनेचा उद्देशच मुळात स्त्रीच्या परिस्थिती बदल घडवून आणणे, तिचे जीवनमान उंचावणे तिला पुरुषाच्या बरोबरीचा सामाजिक दर्जा प्राप्त करुन देणे हा आहे. अगदी प्राचीनकाळापासून स्त्रीयांचे जीवनमान विविध टप्प्यातून गेले आहे.

**प्राचीन भारतीय स्त्रीयांची स्थिती :**

1) **सिंधू संस्कृती** : ही संस्कृती मूळात मातृप्रधान संस्कृती असल्याचे अनेक पुराव्यावरुन निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या काळात सहाजिकरित्या स्त्रीयांचा दर्जा उंच होता. शेतीचा शोधही स्त्रीयांनीच लावल्याचे उल्लेख मिळतात.

**वैदिककाळातील स्त्रीयांची स्थिती :**

पूर्व वैदिककाळात स्त्रीयांवर तेवढीशी जाचक बंधने नव्हती. सामाजिक सण, समारंभ वा उत्सवात, यज्ञ विधित पुरुषासोबत स्त्रियांनाही बसण्याचा अधिकार देण्यात आला. सभा व समिती यांना प्रजापतीच्या

दोन कन्या म्हटल्या गेले आहे. सुरुवातीला स्त्रीस सभ्येय म्हटल्या गेले. स्त्रीयांना सभेत बसण्याचा भाग घेण्याचा चर्चा करण्याचा अधिकार असण्याचे काही प्रमाणात उल्लेख मिळतात. या स्त्रीयांमध्ये गार्गी, मैत्रेयी, ओपाला, घोष आदिंचा उल्लेख येतो.

सुरुवातीला धार्मिक कार्याबरोबरच प्रशासनातही स्त्रीयांना महत्वाचे स्थान असल्याचा उल्लेख आढळतो. राजासोबतच पट्टराणी किंवा महिर्षीस मानाचे स्थान होते. उत्तरवैदिक काळात मात्र स्त्रीयांचा दर्जा अतिश खालावला धर्मशास्त्राने अथवा पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाने स्त्रियांना दुय्यमस्थान देण्यात येऊ लागले. सुरुवातीला स्त्रीयांना शिक्षणचा अधिकार होता असे म्हटल्या जाते. परंतू स्त्रीच्या उपनयन झाल्याचा अथवा गुरुग्रही जाऊन तिने शिक्षण घेतल्याचा कुठेच उल्लेख सापडत नाही. हुंडापध्दती, बालविवाह, वरदक्षिण, सतिप्रथा, विधवाविवाहास बंदी, बहुपत्नीत्व, बहुपतीत्व अशा अनेक प्रथा निर्माण होऊन स्त्रियांना त्यांच्या अधिकारापासून वंचित करण्यात आले. कर्तव्याच्या ओझ्या खाली दबलेली अधिकारहिन स्त्री सनातनी परंपरेने निर्माण केली.

स्त्रीयांच्या जन्म हा अभिशाप समजल्या जाऊ लागला. साधा आशीर्वाद देत असतांनाही अष्टपुत्रभव, सौभाग्यवतीभव, हे उदगार काढून स्त्रीला तीचा परवलंबीत्वाची जाणिव करुन दिल्या जात होती. अनेक धर्मग्रंथकार व स्मृतीकारानेही स्त्रीयांवर जाचक बंधने घातल्याचे उल्लेख आढळतात. मनुस्मृतीतील स्त्री विषयाचे विचार अनेक श्लोकात पाहवयास मिळतात ते पुढील प्रमाणे.

1) अतिक्रामेत प्रस्तं या मतं रोगार्तमेव वा सा त्रीन्मासान्परित्याज्या विभूषण परिच्छदा.

**अर्थात :** पति व्यवहारात चुकलेला किंवा फसलेला असतांना किंवा मादक पदार्थ घेऊन मस्त असतांना किंवा रोगाने पछाडलेला असतांना जी पत्नी पतिच्या सेवेत कसूर करते तीचे दागदागिने काढून घेऊन तीन महिन्यासाठी तीला टाकून द्यावे.

**मनुस्मृतीतील दुसरे उदा. :**

अस्वतंत्रत : स्त्रिय : कार्या : पुरुषै स्वैर्दिवानिशम विषयेषु च सज्जन्त्य संस्थाप्या आत्मनो वशे

**अर्थात :** पुरुषांनी आपल्या स्त्रियांना कधीही स्वातंत्र्य देऊ नये. त्याना जरी रुप, रस, गंध इत्यादिची आवड असली तरी त्यांना नेहमी ताब्यात ठेवावे.

पिता रक्षिती कौमारे भ्राता रक्षिती योवने रक्षिन्ति स्थविरे पूत्रा न स्त्री स्वातंत्र्य महिती

**अर्थात :** बालवयात वडिल स्त्रीचे रक्षण करतात. तारुण्यात पती रक्षण करतो तर म्हातारपणी मुलगे रक्षण करतात. एकूणच स्त्रीला स्वत:चा अधिकार कधीच भोगता येत नाही.

उत्तरवैदिक काळात स्त्रीयांच्या वास्तविक संघर्ष दडपून टाकून त्याभोवती कशा प्रकारे एक अदभूत वलय निर्माण करण्याचा प्रयत्न सनातनी परंपरेने केला हे डॉ. आ.ह.साळुके यांनी आपल्या महाभारतातील स्त्रीयांच्या पात्रातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

उत्तरवैदिक काळात हुंडा पध्दतीचे अनेक उदाहरणे मिळतात. आठ विवाह प्रकारापैकी चार विवाहात हुंडपध्दती व स्त्रीदास्याची अनुभूती मिळते. बहुपत्नीत्वाच्या उदाहरणात रामायणातील दशरथाचे, महाभारतातील पांडव व कृष्णाचा प्रकर्षाने उदाहरणे पुढे येतात. त्याच बरोबर महाभारत बहुपतित्वाचे उदाहरणे मिळतात. भ्रूणहत्या व बाहत्तचे उदाहरण म्हणून कुंती व कर्णाचे उदाहरण देणे योग्य होईल.

जनपदकाळातही स्त्रियांना दुय्यमस्थान दिल्या गेल्याची उदाहरणे सापडतात. त्यात स्त्री गणिका, हुंडापध्दतीचे उदाहरण म्हणून प्रसेनजीतने आपली बहिण महाकोसला हिला दिलेला कोसल प्रान्त उल्लेखनीय ठरतो. गुप्तकाळातही बालविवाह व सतिप्रथेचे उदाहरण प्राप्त होतात. हर्षकाळात हर्षाची आई व बहिणीचे सती जाण्याचे उदाहरण मिळते.

वरील प्रतिकुल परिस्थितीतही वैचारिक क्रांतीच्या प्रभावामुळे म्हणावे लागेल अनेक स्त्रियांनी प्रशासनावर आपली छाप पाडली. गणिका आम्रपाली, प्रभावती गुप्ता, प्रजापती गौतमी, अनेक भिक्षुणी, राजश्री, संघमित्रा आदिंनी प्रशासनाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही आपली छाप पाडली.

**मध्ययुग:**

मध्युगात प्रशासन व राजवटीच्या बदलाबरोबरच स्त्रीयांच्या स्थितीतही अमुलाग्र बदल झाला. मात्र हा बदल सकारात्मक नसून नकारात्मक होता. या काळात स्त्री स्वातंत्र्याला विलक्षण मर्यादा येत गेल्या. कुटुंबातील संपत्तीच्या असमान वाटपाबदल विज्ञानेश्वर, मिताक्षरा, जिमूलवहन, दायभाग व मेघातीयीने समर्थ केले असले तरी त्याची योग्य ती अंमलबजावणी होऊ शकली नाही. मध्ययुगात स्त्री दास्याची चरमसिमा गाठली. मध्ययुगात जिजाबाई, रजियासुलताना, चाँदबीबी, बडिबेगम साहिबा, पद्मावती, नुरजहाँ, महाराणी ताराबाई आदि स्त्रीयांनी प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन मध्ययुगीन स्वीयांनी फार मोठा पराक्रम गाजवलेला आहे.

**आधुनिक काळातील स्त्रीवादाच्या उदयाची कारणे :**

आधुनिक काळात पाश्चात्य राष्ट्रात व भारतातही फार मोठी वैचारिक क्रांती घडुन आली. या वैचारिक क्रांतीत अनेक वैचारिक मतप्रणाली बनल्या व त्यामतप्रणालीचे अपत्य म्हणून आजचा स्त्रीवाद उदयास आला. ती मतप्रणाली पुढीलप्रमाणे.

**मानवतावादी दृष्टीकोणातून स्त्रीवाद :**

मानवतावादी दृष्टिकोणातून सर्व स्त्रीयांना पुरुषाच्या बरोबरीने स्थान देण्यात यावे हा एक नवीन विचारप्रवाह पाश्चात्यांनी याची सुरवात केली. हा विचार पाश्चात्य साहित्य वाचून प्रभावित झालेल्या भारतीय विचारवंतांनी देखील स्वीकारला. यात राजाराममोहन रॉय, महात्मा फुले, कर्वे, रानडे, ताराबाई शिंदे आदिंचा समावेश होतो. स्त्रीच्या मानवीपणाची ओळख पटवून देणे हा मुख्य उद्देश.

**मार्क्सवादी दृष्टिकोणातून स्त्रीवाद :**

मार्क्सवादी विचार व जहाल स्त्रीवादी विचार यांचा समन्वय करुन समाजवादी स्त्रीवाद मांडला गेलेला आहे. मार्क्सवादी स्त्रीवादाची मुळे आपणास प्लेटोच्या साम्यवादातच पाहावयास मिळतात. मार्क्सवादींनी स्त्रियांच्या शोषणाच्या वर्गिय जाणीव तपासून स्त्रीवादास आधुनिक सामाजिक व्यवस्थेत अस्तित्व मिळवून दिले.

**औद्योगिक क्रांतीतील स्त्रीवाद : वसाहतवादी दृष्टिकोणातील :**

**स्त्रीवाद :**

औद्योगिक क्रांतीनंतर ग्रामीणभागत राहणाऱ्या स्त्रीयांचे स्थानांतर होऊ लोगले व त्यांचा नवीन शहराशी परिचय येऊ लागल्यामुळे त्याच बरोबर शहरीभाग विभक्त कुटुंबपध्दतीचा प्रभाव जास्त

असल्यामुळे स्त्री वरील बंधने कमी होत गेली. तिला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव निर्माण झाली. औद्योगिकरणामुळे वेगवेगळ्या विभागाचे शिक्षण प्रशिक्षण नाईलाजाने का होईना स्त्रीयांना मिळू लागले.

औद्योगिककारणमुळे वेगवेळ्या क्षेत्रात स्त्रीया कार्यरत झाल्या वेगवेगळ्या क्षेत्राचे शिक्षण प्रशिक्षण स्त्रीयांनी घेतल्यामुळे समान कामासाठी समान वेतन ही संकल्पना उदयास आली. वसाहतवादातून पाश्चात्य राष्ट्राचा अविकासीत राष्ट्रांशी संबंध आला. त्यातुन पाश्चात्य जागृतीची बीजे वसाहतीत पेरल्या गेली. त्याचबरोबर पाश्चात्य दृष्टिकोण वसाहतीत लागू झाला.

पाश्चात्य देशातील स्त्रीचा स्वातंत्र्यविषयक जाणवेचा पहिला टप्पा म्हणजे, मतदानाचा हक्क मिळविणे हा होता. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स यादेशातील कष्टकरी आणि मध्यमवर्गीय स्त्रीयांनी मतदानाचा हक्क, शिक्षण, संपत्ती आणि समान कायदा, यासाठी चळवळ उभी केलेली दिसते. इंग्लंडमध्ये १९८२ मध्ये सर्व २१ वर्षावरील स्त्रीयांना मत देण्याचा अधिकार प्राप्त झाला. १९१९ साली कोपनहेग येथे एक आंतराष्ट्रीय महिला परिषद भरली ज्यात आठ मार्च हा संपूर्ण जगातल्या स्त्रीयांनी आपल्या हक्कासाठी स्मरण देणारा दिवस म्हणून म्हणजेच महिला दिन म्हणून मानला जाऊ लागला. १९४४ साली फ्रान्स मध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त करुन दिला.

वरील सर्व पाश्चात्य विचारसरणीचा एक वसाहत म्हणून भारतावर प्रभाव पडणे सहाजीकच होते व त्यातुन भारतीय स्त्रीवाद उदयास आला. भारतात अनेक युरोपिय विचारवंत, ख्रिश्चन मिशनरी यांनी स्त्री शिक्षणास सुरुवात केली. त्यानंतर राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, रानडे, आंबेडकर इत्यादींनी हा वारसा पुढे चालविला.

**म.फुले यांचा स्त्रीवादी दृष्टिकोण :**

मानवता व समतेचा पुरस्कार करणाऱ्या महात्मा फुले यांना सर्वप्रथम स्त्री-पुरुष समानता आणणे गरजेचे वाटले. त्यासाठी त्यांनी आपल्या घरातूनच सुरुवात केली व आपल्या पत्नीला शिक्षिका बनविले. सावित्रीबाईच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानतेचे आदर्श उदाहरण म.फुले यांनी भारतीय समाजापुढे ठेवले. स्त्री आणि पुरुष दोघांनाही एकाच निर्मिकाने निर्माण केलेले असून, ते समान पातळीवर आहेत. स्त्रीयांच्या दुय्यमत्वाची कारणे, त्यांच्या नैसर्गिक शरीर धर्मात नसून पुरुषाच्या कावेबाजपणात आहेत. स्त्रीयांना कावेबाजपणाने विद्या शिकण्यास प्रतिबंध केल्यामुळे स्त्री ग्रंथ लिहण्यायोग्य विद्वान झाल्या नाहीत. पुरुषांनीच लिहिलेल्या धर्मग्रंथात स्त्रीयांच्या हक्कांना डावलले स्त्रीयांना मानवी हक्क समजू देवुन नये म्हणून हा सगळा धूर्तपणा पुरुषांनी केला हे. म.फुले यांनी स्पष्ट केले.

**आंबेडकरांचा स्त्रीवादी दृष्टिकोण :**

भारतीय घटनेने न मागताच स्त्रीयांना मतदानाचा अधिकार प्राप्त करुन दिला. स्त्रीयांच्या अस्तित्वाची लढाई हिंदुकोड बिलातून प्रत्यक्षरित्या डॉ.आंबेडकरांनी लढली. स्त्री मुक्तीच्या संदर्भात डॉ.आंबेडकरांची विशिष्ट दृष्टी दिसून येते.

हिंदूत्वातील कूट प्रश्न या लेखनात तर डॉ.आंबेडकरांनी हिंदुधर्मातील तत्वांचे विपरी वाचनच करुन, त्यातील पुरुषांची दुटप्पी नीतिमूल्ये उघड केलेली दिसतात. हिंदूकोड बील ही सर्वात मोठी समाज सुधारणा होती असे म्हणणे चुक ठरणार नाही.

**निष्कर्ष:**

स्वीवादाच्या सर्व प्रवाहांचा एकंदरीत अभ्यास केल्यानंतर आपणास प्रकर्षाने जाणवते की, स्त्री-पुरुष समानता ही सर्वांगाने काळाची गरज आहे. यादृष्टीने पाश्चात्य राष्ट्रात व भारतात अनेक संघटनांनी कार्य केले. संघर्ष केला. त्याची परिणिती म्हणून स्त्रीयांच्या जीवनमानात थोडाफार बदल झाला. परंतू हा बदल म्हणावा तसा समाधानकारक नाही. शिवाय या बदलाने केवळ पुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ बदलले पुस्तकाचा आशय अजून बदलणे गरजेचे आहे. व त्यादृष्टीने वाटचाल करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१) प्रमुख राजकीय प्रणाली, डॉ.दाते, डॉ.ढोबळे
२) स्त्रीयांची आत्मचरित्रे व स्त्रीवादीशोध, डॉ.शोभा पाटील
३) महाभारतातील स्त्रीया, डॉ.आ.ह.साळुके
४) हिंदूकोड बील, खैरमोडे बी.सी.
५) विषमतेचा पुरस्कर्ता मनू, डॉ.प्रदिप गोखले
६) स्त्रीमुक्ती चळवळ आशय व दिशा
७) स्त्री मुक्ती : आजचे संदर्भ, सरोज कांबळे
८) स्त्री प्रश्नांची चर्चा एकोणीसावे शतक, प्रतिभा रानडे
९) स्त्री संघर्ष का इतिहास १८००-१९०० राधाकुमार
१०) स्त्री प्रश्नांची वाटचाल, विद्युत भागवत
११) स्त्री-पुरुष तुलना, ताराबाई शिंदे
१२) लज्जा, तस्लीमा नसरीन.